शहीद स्मारक नानोरी, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती या हुतात्मा स्मारकाच्या परिरक्षण, निगा व दुरुस्तीचे काम “विशेष बाब” म्हणून करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१९१८/प्र.क्र.४८/२०१८/स्वासैक-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक-१७ मे, २०१८.

प्रस्तावना :

शहीद स्मारक नानोरी, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती या हुतात्मा स्मारकाच्या परिरक्षण, निगा व दुरुस्तीबाबत मा. राज्यमंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली चांदूरबाजार, (जि.अमरावती) विधानसभा क्षेत्राचे विधानसभा सदस्य यांच्यासमवेत सोमवार दिनांक १६/०४/२०१८ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत नानोरी, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती हुतात्मा स्मारकाचे काम “विशेष बाब” म्हणून पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय :

शहीद स्मारक नानोरी, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती या हुतात्मा स्मारकाच्या परिरक्षण, निगा व दुरुस्ती या कामाबाबत मा. राज्यमंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दिनांक १६/०४/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत सदर स्मारकाचे सौंदर्यकरण, निगा व परिरक्षणाचे काम “विशेष बाब” म्हणून करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी अंदाजे रु. १,२५,००,०००/-(रु. एक कोटी पंचवीस लक्ष फक्त) इतक्या निधीची आवश्यकता लागणार असून सदरचा निधी रु. ५०,००,०००/- (रु. पन्नास लक्ष फक्त) शासन स्तरावरून, रु. ६०,००,०००/- (रु. साठ लक्ष फक्त) इतका निधी जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडील नाविन्यपूर्ण योजनेतून तर रु. १५,००,०००/- (रु. पंधरा लक्ष फक्त) इतका निधी स्थानिक आमदार यांच्या आमदार निधीमधून उपलब्ध करण्यात येईल. सदर काम आठ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

२. या कामाकरीता होणारा खर्च चालू आर्थिक वर्षातील मागणी क्र. ए-४ २०५९-सार्वजनिक बांधकामे, (८०) सर्वसाधारण, ०५३- परिरक्षण व दुरुस्ती (००) (०१) हुतात्मा स्मारकांचे परिरक्षण व निगा यासाठी सहायक अनुदान (२०५९ ००१५) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदीतून भागविण्यात यावा आणि त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५१७१७०६२५८००७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Arun Vasnt Shinde

Digitally signed by Arun Vasnt Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=213d983c0c3b73519fa14c37396dd0b3cf8f28e16bc2fb6620a5c4fdac6e7284, serialNumber=672d36cc7468aa812e66dbb4704ffeb120dd58831284824f4fbec2a6f6602199, cn=Arun Vasnt Shinde
Date: 2018.05.17 17:04:25 +05'30'

(अरुण व. शिंदे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री (सा.प्र.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) वित्त, नियोजन यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. मा. श्री. बच्चू कडू, विधानसभा सदस्य, विधानभवन, मुंबई
७. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव व वि.चौ.अ.१ यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १, मुंबई,
१०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र २, नागपूर,
११.महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १, मुंबई,
१२.महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र २, नागपूर
१३.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१४.जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती, जि. अमरावती
१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१६.अधीक्षक अभियंता (सा. बां), जि. अमरावती
१७.जिल्हाधिकारी अमरावती, जिल्हा अमरावती
१८. कार्यकारी अभियंता (सा. बां), अचलपूर/चांदूरबाजार जि. अमरावती
१९.तहसिलदार चांदूरबाजार, जि. अमरावती
२०.कक्ष अधिकारी कार्या२५ (अर्थसंकल्प) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२१.कक्ष अधिकारी, वित्त विभाग, (अर्थ संकल्प १३ / व्यय-४) मंत्रालय, मुंबई
२२.निवड नस्ती/स्वासैक-१.